**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १० जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या कर्ज वसुलीच्या पद्धती निष्पक्ष आणि सहानुभूतीपूर्ण पद्धतीने राबवायला हव्यात - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन.**
2. **गणेशोत्सव हा सण राज्य महोत्सव म्हणून घोषित करणार - सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची ग्वाही.**
3. **वाशिम, भंडारा, अंबरनाथ आणि पालघर इथल्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कामांना गती द्या: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना.**
4. **विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

---

**निर्मला सीतारामन**

**बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या कर्ज वसुलीच्या पद्धती निष्पक्ष, सहानुभूतीपूर्ण आणि आदरयुक्त पद्धतीने राबवल्या जायला हव्यात, आणि त्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निष्पक्ष व्यवहार संहितेशी काटेकोरपणे सुसंगत असायला हव्यात, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल नवी दिल्ली इथं बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या परिषदेला संबोधित करत होत्या. आर्थिक समावेशन हे आर्थिक शोषणाचं माध्यम म्हणून वापरलं जाऊ नये, असं त्या यावेळी म्हणाल्या.**

***(होल्ड बाईट - सीतारामन - २२ सेकंद)***

*Financial inclusion cannot be used as a pretext for financial exploitation. Lending should be based on genuine needs and repayment capacity of the customers. Loans should not be aggressively marketed or pushed. These messages are going to*

*be seriously taken because that's what is going to be the underlining strength of NBFC's in the years to come.*

**कर्ज वितरण हे ग्राहकांच्या रास्त गरजा आणि कर्ज परतफेडीच्या क्षमतेवर आधारित असायला हवं, यावर त्यांनी भर दिला. कर्जाचं आक्रमकपणे मार्केटिंग करून ते कोणावर लादलं जाऊ नये, तसंच व्याजदर वाजवी असायला हवा, असं त्यांनी सांगितलं. बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी आपल्या नीतिमत्तेचा भाग म्हणून प्रशासन, जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहक संरक्षणाला महत्वाचं स्थान द्यायला हवं, असं सीतारामन यांनी नमूद केलं.**

**------------------------------------------**

**गणेशोत्सव-विधानसभा**

**महाराष्ट्राला गणेशोत्सवाची शंभर वर्षांची समृद्ध परंपरा असून हा सणराज्य महोत्सव म्हणून हे सरकार घोषित करेल, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज विधानसभेत दिली. पुण्याच्या कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनीउपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्याला ते उत्तर देत होते.**

***(होल्ड बाईट - आशीष शेलार २० सेकंद)***

***महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असा असलेला आपला गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून राज्य सरकार घोषित करेल हे त्याठिकाणी आजच मी स्पष्टीकरण करतो.आणि देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती संस्कृती, प्रकृती, प्रवृत्ती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटिबद्ध राहील.***

**या उत्सवात विविध अडथळे आणण्याचे, न्यायालयांमध्ये जाण्याचे सगळे प्रयत्न दूर करायला आपलं सरकार वचनबद्ध असून जितका हवा तितका निधी या उत्सवासाठी उपलब्ध करून देऊ, असं आश्वासनत्यांनी दिलं. गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, आपल्या देखाव्यांमध्ये भारतीय सैन्य, महाराष्ट्राने विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेलं यश अधोरेखित करावं, त्यांना काहीही कमी पडू दिलं जाणार नाही, असंही शेलार यांनी नमूद केलं.**

**------------------------------------------**

**कृषीमंत्री माणिकराव कोकाटे-विधानसभा**

**प्रत्येक गावात वेगळं हवामान अंदाज केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज विधानसभेत दिली. यामुळे त्या गावाच्या आजूबाजूच्या वीस किलोमीटर परिसरातील हवामानाचा अंदाज त्यात**

दिसून येईल. त्यातून फळ विमा योजनेला आवश्यक निकष लागू करणं सोपं होईल, असं ते महणाले. एक रुपयात विमा या योजनेत विमा कंपन्यांना सुमारे साडे सात हजार कोटी रुपयांचा नफा झाला आहे. त्या मानाने शेतकऱ्यांना हवा तसा लाभ मिळाला नाही. त्यामुळे पुन्हा जुनी पीक विमा योजना राबवण्यात येत आहे, अशी माहिती कोकाटे यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना राजेश विटेकर यांनी उपस्थित केली होती. जुन्या विमा योजनेमुळे साधारणपणे साडे चार ते पाच हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यातून सुमारे पंचवीस हजार कोटी रुपयांची कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

मराठी माणूस हक्क-विधानसभा

मुंबई आणि महाराष्ट्रात सगळ्यात पहिला हक्क हा मराठी माणसाचा आहे. तो हक्क डावलला जाणार नाही, अशी ग्वाही मंत्री शंभुराज देसाई यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. एखाद्या ठिकाणी मराठी माणसाला घर नाकारलं जात असेल, तर त्या विकासकावर निश्चित कारवाई केली जाईल, असेही देसाई यांनी सांगितलं.

-------------------------------------------

पाणीपुरवठा बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे काटोल, नरखेड आणि मोवाड नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेबाबत बैठक घेण्यात आली.

-------------------------------------------

गुरुपौर्णिमा

गुरुपौर्णिमा आज साजरी होत आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाणाऱ्या गुरुजनांच्या चरणी कृतज्ञतेचं वंदन करण्याचा हा दिवस आहे. या निमित्तानं सर्वत्र गुरुपूजनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुरुपौर्णिमेनिमित्त नागपूरच्या साई मंदिरात भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली. दत्त मंदिर, गजानन महाराज मंदिर इथं देखील गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येत आहे. वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथील नृसिंह सरस्वती स्वामी महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. तिथं दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती.

-------------------------------------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

राज्यातील वाशिम, भंडारा, अंबरनाथ आणि पालघर येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं प्रस्तावित आहेत. या महाविद्यालयांच्या बांधकामाकरिता जागा उपलब्ध होण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्राधान्याने जागा उपलब्ध करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. विधानभवन येथे निर्माणाधीन वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांच्या जागा उपलब्धता आणि बांधकाम प्रगतीच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, सिंधुदुर्ग, जालना, अमरावती, वाशिम, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली, परभणी आणि हिंगोली येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांच्या रुग्णालयांचे काम सुरू आहे. या महाविद्यालयांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नियमांनुसार सर्व कामांचा सुधारित सर्वसमावेशक प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर सादर करावा, असेही ते म्हणाले.

-------------------------------------------

## सिंदूर पूल

मुंबईत सिंदूर या उड्डाणपुलाचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं. दीडशे वर्षांपासून या  पुलाला कर्नाक पूल म्हणून ओळखलं जायचं. कर्नाक हा ब्रिटीश गव्हर्नर भारतीयांना फसविणारा आणि अत्याचार करणारा असल्याने त्याच्या काळ्या इतिहासाच्या खुणा पुसण्यासाठी कर्नाक पुलाचे सिंदूर नामकरण केल्याचे फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. सिंदूर पूल हा मुंबईकरांना समर्पित असून आज दुपारी तीन वाजता हा पूल वाहतुकीसाठी खुला होईल, असंही त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

## जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम येत्या रविवारी दि.१३ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. नागरिकांनी

आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरूपातच  आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

-------------------------------------------

## प्रभावती सबाने पुरस्कार

प्रभावती सबाने यांच्या स्मरणार्थ दरवर्षी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सामाजिक कार्य करणाऱ्या एका कार्यकर्त्यास पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. 2024/25 या वर्षासाठीचा पहिला पुरस्कार उल्का महाजन रायगड या जल, जंगल, जमीन या क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या कार्यकर्तीस प्रदान करण्यात आला. कष्टकरी स्त्रियांसाठी लढणाऱ्या उमरेडच्या मेहरून्निसा शेख, बिहारमधील स्त्रियांसाठी काम करणाऱ्या कल्पना शास्त्री, असंघटित क्षेत्रातील स्त्रियांसाठी काम करणाऱ्या नागपूरच्या सुजाता भोंगाडे आणि खुलूसकार समीर गायकवाड, सोलापूर यांनाही हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .

-------------------------------------------

## ‘मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनिट’

नागपूर शहरातील नागरिकांची विविध आजारांपासून सुरक्षा करण्याकरिता मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनिटची भूमिका महत्वाची आहे. विविध विषयाशी संबंधित तज्ञ आणि शहरातील इतर विभागांचे योगदान या सर्वांशी समन्वयाने शहरात आरोग्य सुरक्षेचे कार्य होणार आहे. यात नागपूर शहराच्या सुदृढ आरोग्यासाठी ‘मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनिट’ (एमएसयू) समन्वयकाची भूमिका निभावणार आहे, असा सूर एमएसयू प्रशिक्षणादरम्यान मान्यवरांनी व्यक्त केला.मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेअंतर्गत सुरू झालेल्या मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनिटच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता ७, ८ आणि ९ जुलै २०२५ रोजी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

-------------------------------------------

## महिला क्रिकेट

भारत आणि इंग्लंड महिला क्रिकेट संघांदरम्यान ब्रिटनमध्ये काल झालेल्या टी-२० मालिकेच्या चौथ्या सामन्यात, भारतीय संघाने यजमान इंग्लंडचा सहा गडी राखून पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत तीन-एक अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं २० षटकांत ७ बाद १२६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, भारतीय संघाने केवळ १७ षटकांत चार गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण

केलं. सलामीवीर स्मृती मानधनाने ३२ तर शेफाली वर्माने ३१ धावांचं योगदान दिलं.

---

भारत-इंग्लंड-क्रिकेट

भारत आणि इंग्लंड दरम्यान इंग्लंडच्या लॉर्ड्स मैदानावर आज तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याला सुरुवात झाली. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताकडून नितेशकुमार रेड्डीने भेदक गोलंदाजी करत इंग्लंडचे सलामीचे फलंदाज लागलीच तंबूत पाठवले. शेवटचं वृत्त हाती आलं, तेव्हा इंग्लंड संघाच्या 25 षटकात 2 गडी बाद 83 धावा झाल्या होत्या.

---

हवामान

विदर्भातील बुलढाणा आणि अकोला जिल्हा वगळता संपूर्ण विदर्भात उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तत्पूर्वी, आज पूर्व विदर्भात येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यानुसार चंद्रपूरमध्ये पावसाची नोंद झाली असून नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, नागपुरात काल दुपारपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. गडचिरोलीमध्ये देखील सध्या पावसाने विश्रांती घेतली आहे. मात्र तत्पूर्वी पडलेल्या पावसामुळे ठप्प झालेली १५ मार्गांवरील वाहतूक अद्यापही ठप्प आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी उपविभागात गोसेखुर्द धरणाचे पाणी वैनगंगा नदीच्या पुरावाटे शेत शिवारात येत असल्याने शेतकऱ्यांना सतत नुकसान होत आहे. धरणाचे पाणी इतर भागात लाभदायी ठरले असले, तरी त्यामुळे ब्रह्मपुरी तालुक्यातील धान आणि भाजीपाला पिके घेणाऱ्या लाडज -पिंपळगाव अहेर, नवरगाव या भागांमध्ये मात्र संकट ठरले आहे. जिल्ह्यातील बहुतांश नदी, नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. या उद्‌भवलेल्या नैसर्गिक परिस्थितीमुळे अद्याप कुठेही जीवित हानी झाल्याचे वृत्त नाही.

---